देशदूत - 15/12/2013

# डोळ्यांच्या पडद्याची विनामुल्य तपासणी

**जळगाव, दि.१४ (प्रतिनिधी)**

रेटिना इंडिया व एम्को फाउंडेशन यांच्या सयुक्त विद्यमाने जळगाव शहरात डोळ्यसांच्या पडद्याचे (रेटिना) तपासणी शिबीराचे आयोजन १५ रोजी खान्देश सेंट्रल मॉल तळमजला जळगाव येथे सकाळी ९ ते संध्याकाळी ४ या वेळेत करण्यात आले आहे.

शिबीरामध्ये बायोनिक आयचे संशोधन, अमेरिका येथील रहिवासी व संकरा नेत्रालय चेन्नई येथील पूर्व सल्लागार डॉ.रजत अग्रवाल हे आपल्या तज्ञ सहकाऱ्यांसह डोळ्यांच्या पडद्याचे(रेटीना) विनामुल्य तपासणी करणार आहेत. सकाळी ९:३० ते १० या वेळेत डॉ.अग्रवाल डोळ्यांच्या पडद्याच्या दोषांवर उपचारासंदर्भात प्रभावी मार्गदर्शन करतील. शिबीरात अत्यंत गरजू रूग्णांना विनामुल्य लेसर थेरपी द्रेण्यात येईल. नावनोंदणीसाठी सरकारी दवाखाना, नेत्र विभाग रूम नं.१०३, जळगाव वेळ सकाळी ९ ते दु.१२ डॉ. कुमावत, संपर्क ९४२३९४९४४५, नेत्रज्योती हॉस्पीटल, सिंधी कॉलनी जळगाव, एम.बी. पाटील ०२५७-२२२९७०७, २२२७८९४ येथे संपर्क साधावा, असे आवाहन एम्को फाउंडेशन विश्वस्त मिनाक्षी जैन यांनी केले आहे.